# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक :- १२९/२०२५ दिनांक :- १९/०३/२०२५.

## गावठी हातभट्टीची दारु विक्री करणा-या महिलेवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,मिरा-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक १८/०३/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदरचे सफौ/शिवाजी पाटील यांना वर्सोवा गांवातील, हिल व्हिव गेस्ट हाऊसच्या पाठीमागील चंदर रामजी जाधव यांच्या रुममध्ये राहणारी निर्मला जाधव ही ती राहत असलेल्या घराचे बाजुस पडवीमध्ये गावठी हातभट्टीची दारु विक्री करते, अशी बातमी मिळाली.

मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी १५.२५ वा. छापा टाकला असता श्रीमती निर्मला अनंत जाधव, वय ३५ वर्षे चंदर रामजी जाधव यांची रुम, हिल व्हिव गेस्ट हाऊसच्या पाठीमागे, दुर्गादेवी रोड, वर्सोवा गांव, काशिमिरा ही तिचे घराचे बाजुस असलेल्या पडवीमध्ये स्व:ताच्या आर्थिक फायदयाकरीता ३,६००/- रु किंमतीची ३० लिटर गावठी हातभट्टीची दारु तसेच ८४०/- रुपये किंमतीची ९० मिलीच्या २४ प्लास्टीकच्या देशी दारु संत्रा जीएम जवळ बाळगून विक्री करत असतांना ८७०/- रु रोख रक्कमेसह मिळुन आली तसेच पाहिजे आरोपी नामे गणेश रा. ससुनवघर याने तीस गावठी हातभट्टीची दारु पुरविली म्हणुन वर नमुद महिला आरोपीस महिला पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन सदर बाबत दोन पंचासमक्ष सफौ/उमेश पाटील यांनी पंचनामा केला आहे. सदरबाबत पोशि/चेतनसिंग राजपुत यांनी यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक १२२/२०२५, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर पथकाचे पोनि/देविदास हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे, सफौ/उमेश पाटील, सफौ/रामचंद्र पाटील, सफौ/राजाराम आसावले, सफौ/शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/चेतनसिंग राजपुत, पो.शि./केशव शिंदे, मपोहवा/निशीगंधा मांजरेकर व चापोहवा/सम्राट गावडे यांनी केली आहे.